प्रेसनोट

दि. १४/१०/२०२४

## ॲन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून भिगवन, जि. पुणे येथील वनविभागाचे वनरक्षक यांचेवर लाच मागणी प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | भिगवन पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण गु.र.नं. ४३२/२०२४. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७, ७ अ अन्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय ३० वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | उल्हास दत्तात्रय मोरे, वय ३२ वर्ष, पद - वनरक्षक, भिगवन सर्कल कार्यालय, इंदापूर वनविभाग, ता. इंदापुर, जि. पुणे. (वर्ग-३) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १०,०००/- |
| पडताळणीअंती लाच मागणी रक्कम | ६,०००/- (सहा हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | दि. २३/०८/२०२४ रोजी |
| ठिकाण | हॉटेल भक्ती शक्ती प्युअर व्हेज, भिगवन-सोलापूर रोडवर, भिगवन, पुणे. |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे रहात असलेल्या घरासाठी वनविभागाच्या जागेतून पुर्वीपासून रस्ता वापरत होते. नजीकच्या काळात अतिवृष्टी झाल्यामुळे सदर रस्त्यावर खड्डे व चिखल झाला. त्यामुळे तक्रारदार यांनी स्वखर्चाने सदर रस्त्यावर मुरूम टाकला. लोकसेवक उल्हास मोरे, वनरक्षक यांनी सदर वनखात्याच्या जमीनीवर मुरुम का टाकला ? म्हणुन गुन्हा दाखल करतो असे सांगितले. लोकसेवक उल्हास मोरे यांनी तक्रारदार यांचेकडे गुन्हा दाखल न करण्यासाठी १०,०००/- रुपये लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारदार यांच्या तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, लोकसेवक उल्हास मोरे यांनी तक्रारदार यांचेकडे वरील कामासाठी ७,०००/- रुपयांची लाच मागणी करुन, पंचासमक्ष तडजोडीअंती ६,०००/- (सहा हजार रुपये) रुपये लाच रक्कम मागणी केल्याचे निष्पन्न झाले. लोकसेवक उल्हास मोरे यांचेवर भिगवन पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे वरील प्रमाणे लाच मागणीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक प्रसाद लोणारे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

14/10/24

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

Scanned with CamScanner